Postal Regd. No. NSK/RNP-244/2018-2020

रजि. नं. एम. ए. एच. एम. ए. आर./२००२/९५०६



॥ भगवान प्रभु श्री विश्वकर्मा॥

# मजदूर संकेत

॥ हम करें राष्ट्र आराधन ॥




* वर्ष : १९ वे * अंक : तिसरा * नाशिक, २५ मार्च २०२० * पाने : २४ * वार्षिक वर्गणी : रु. १५० *

# फ्रांचायझी विरोधात कामगार रस्त्यावर! निषेध सभांच्याद्वारे नोंदवला असंतोष!!

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने याआधीच्या फडणवीस सरकारने घेतलेले सर्व निर्णय एकतर रद्द केले किंवा त्यांचा फेरविचार सुरू आहे. या सुडाच्या प्रवासात एक निर्णय महाविकास आघाडीने रद्द केला नाही. उलट त्याची तातडीने अंमलबजावणी केली. तो निर्णय म्हणजे मुंब्रा, शिळ, कळवा आणि मालेगाव ही शहरे फ्रांचायझीकडे सोपवण्याचा! बावनकुळे उर्जामंत्री असतांना त्यांनी ही चार शहरे फ्रांचायझीकडे सोपवण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबत संघटनांशी चर्चासुद्धा केली होती व संघटनांचा विरोध लक्षात घेऊन जबरदस्तीने निर्णय लादण्याऐवजी सहमतीसाठी चर्चा सुरू केली होती. त्यावेळी मुंब्राचे आमदार श्री. जितेंद्र आव्हाड हे फ्रांचायझीचे विरोधात ठामपणे उभे होते. तीन महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात सत्तांतर झाले. फडणवीस जाऊन ठाकरे आले आणि मुख्य म्हणजे मुंब्रा- कळवा, शिळ फ्रांचायझीचे घोर विरोधक श्री. जितेंद्र आव्हाड मंत्री झाले. त्यामुळे मंडळातील कामगार संघटनांच्या आशा पल्लवीत झाल्या. आता काही फ्रांचायझी येत नाही. कारण फ्रांचायझी विरोधकच मंत्री झाले आहेत. परंतु असे काही झाले नाही. उलट बावनकुळेंनी थंड बस्त्यात ठेवलेला विषय नव्या उर्जामंत्र्यांनी श्री. नितीन राऊत यांनी कोणाशीही चर्चा न करता अमलात आणला.

या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील वीज कामगारांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रमुख संघटनांच्या कृती समितीने या धोरणाला विरोध करण्यासाठी क्रमबद्ध आंदोलनाचा निर्णय घेतला असून, कामगार महासंघ त्यात आघाडीवर आहे.

महासंघाचे अध्यक्ष श्री. होळीकर व महामंत्री श्री. पहाडे यांनी महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना याबाबत योग्य ते निर्देश दिले आहेत.

## आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात विविध ठिकाणी झालेल्या निषेध सभांची काही क्षणचित्रे!



वसई



भांडुप झोन

# आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात विविध ठिकाणी झालेल्या निषेध सभांची काही क्षणचित्रे!


पारस निर्मिती


उरण निर्मिती झोन


वर्धा सर्कल


पनवेल-भांडुप झोन


नाशिक पारेषण झोन


नांदेड झोन


देगलुर-नांदेड झोन


कोल्हापूर झोन

# पनवेल मेळावा

**दिनांक २३-०२-२०२०** रोजी पनवेल येथे भारतीय मजदूर संघाचे संस्थापक कै. श्रद्धेय दंतोपंत ठेंगडी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या मुख्य कार्यालय मुंबई महावितरण भांडूप झोन, कल्याण झोन, महानिर्मिती उरण झोन व महापारेषण वाशी झोनचा भव्य कार्यक्रम महासंघाचे माजी अध्यक्ष आदरणीय आण्णाजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

या भव्य कार्यक्रमास महासंघाचे महामंत्री श्री. शंकर पहाडे साहेब, पनवेल नगरीचे विद्यमान आमदार श्री. प्रशांतदादा ठाकूर साहेब, भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. नंदा ओझे साहेब व श्री. बाळ पुराणिक साहेब प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास महासंघाचे राज्य सचिव श्री. सुरेशचंद्र सोनार, निवासी सचिव (प्रदेश) श्री. प्रशांत भांबुर्डेकर, उपमहामंत्री श्री. विजय हिंगमिरे आदींनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमावेळी मागासवर्गीय ३५ व वर्कर्स फेडरेशन या संघटनेतून १२ कामगारांनी महाराष्ट्र वीज कामगार महासंघात जाहीर प्रवेश केला. त्या सर्वांचे जे फॉर्म महावितरण उपाध्यक्ष श्री. सुनिल कासारे, भांडूप झोन सचिव श्री. सचिन शिंदे व झोन अध्यक्ष श्री. रमेश नाईक, वाशी सर्कल सचिव श्री. प्रणव मानकामे, ठाणे सर्कल सचिव श्री अमोल लाहिरे व पेण सर्कल सचिव श्री. प्रसाद कुलकर्णी यांनी महामंत्री यांच्याकडे सुपूर्द केले.

या कार्यक्रमास महासंघाचे महावितरण उपाध्यक्ष श्री. सुनिल कासारे, निवासी सचिव श्री. बाळ आवारे, भारतीय मजदूर संघाचे श्री. चंद्रकांत नेवे, भांडूप, कल्याण, उरण, मुख्य कार्यालय झोनचे सचिव श्री. सचिन शिंदे, श्री. सचिन कदम, श्री. शैलेश धसाडे, श्री. अमोल तरे व भांडूप झोन अध्यक्ष श्री. रमेश नाईक, उरण झोन अध्यक्ष श्री. संतोष कार्ले, ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. दिलीप मुद्देबिहाळकर व श्री. प्रदिप दळवी, वसई सर्कल सचिव श्री. वैभव मस्के व कल्याण सर्कल सचिव श्री. अरुण दलाल व बहुसंख्य कामगार व महिला कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सुत्रसंचालन भांडूप झोन अध्यक्ष श्री. रमेश नाईक यांनी व आभार प्रदर्शन वाशी सर्कल सचिव श्री. प्रणव मानकामे यांनी केले.

## काही क्षणचित्रे









# काळानुसार डिजिटलायझेशन आत्मसात करा : होळीकर

## महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचा मेळावा








**सोलापूर** : आजचे युग स्पर्धेचे आहे. सर्वच क्षेत्रात स्पर्धा सुरू असून, भविष्यात टिकून राहायचे असेल तर काळानुसार वीज कर्मचाऱ्यांनी डिजिटलायझेशन आत्मसात करावे, असे आवाहन वीज कामगार महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश होळीकर यांनी केले.

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सोलापूर संघटनेचा जिल्हा मेळावा १ मार्च रोजी शांतीसागर मंगल कार्यालयात पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आज महिलांची उपस्थिती लक्षणीय आहे. महिलांनी नेहमी अग्रेसर राहावे, ज्या अडचणी असतील त्या आपल्या सदस्यांसमोर मांडून सोडवून घ्याव्या. महिला असो किंवा पुरुष असो सर्वांना संगणक आणि मोबाइलबद्दल तरी निदान माहिती असणे आवश्यक आहे. संघटन वाढीसाठी अजून प्रयत्न होणे गरजेचे आहे. भविष्यात प्रतिस्पर्धी कंपन्या येतील त्यासाठी तग धरून राहायचे असेल तर आधुनिकतेचा, डिजिटलायझेशनचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

यावेळी व्यासपीठावर संघटनेचे संघटनमंत्री सुभाष सावजी, उपमहामंत्री विजय हिंगमिरे, उपाध्यक्ष दिलीप आंबेगावकर, प्रभारी बारामती धनंजय इनामदार, वीज निवृत्त कर्मचारी संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष यशवंत बुऱ्हाडे, बारामती झोन सचिव विजयकुमार राकले, सर्कल अध्यक्ष सुनील गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कर्मचाऱ्यांच्या अनेक अडचणी मांडण्यात आल्या. अडचणी सोडवण्याचे आश्वासन यावेळी होळीकर यांनी दिले. यावेळी महिलांचे फेटे आकर्षक ठरत होते. मेळावा शिस्तबद्ध झाल्यामुळे कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन सोलापूर सर्कलचे सचिव संजय जाधव यांनी केले.

# सहकारी बँक कर्मचारी यांचे अखिल भारतीय अधिवेशन संपन्न




सहकारी बँक कर्मचारी करता कार्यरत 'नॅशनल ऑर्गनायजेशन ऑफ को– ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज'चे अखिल भारतीय प्रथम अधिवेशन ९ फेब्रुवारी २०२० रोजी ब्राह्मण सेवा संघ, ठाणे येथे संपन्न झाले. अधिवेशनास भारतीय मजदूर संघाचे महामंत्री मा. श्री. ब्रिजेशजी उपाध्याय यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन झाले. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय मजदूर संघाचे उपाध्यक्ष व आर्थिक विभाग प्रमुख मा. श्री. लक्ष्मा रेड्डी, एन. ओ. बी. ओ. चे श्री. टिकेकर, भा. म. संघ महाराष्ट्र प्रदेश महामंत्री मा. श्री. रविंद्र देशपांडे तसेच ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. पत्की साहेब यांचे निरनिराळ्या विषयांवर मार्गदर्शन झाले.

अधिवेशनात महाराष्ट्र, झारखंड, त्रिपुरा, मध्यप्रदेश व गोवा या राज्यातून १३५ प्रतिनिधी उपस्थित होते. सहकारी बँक कर्मचारी यांचे करिता बोनस, पेंशन, सेवा नियम कर्मचारी प्रतिनिधित्व व सहकारी बँकेकरिता को– ऑप. बँक ऑफ इंडिया या प्रमुख विषयांवर चिंतन होऊन

प्रस्ताव पारीत करण्यात आले. संघटनेचे काम उर्वरित सर्व राज्यांमध्ये सुरू व्हावे या करिता रुपरेषा व कार्यक्रम तयार करण्यात आले.

अधिवेशनाचे प्रायोजक ठाणे जनता सहकारी बँक कर्मचारी अधिकारी संघाचे महामंत्री श्री. अरुण देसाई व अध्यक्ष श्री. देवधर यांनी संघटनेचे आगामी कार्यक्रम तसेच प्रास्ताविक केले. अधिवेशनाचे संयोजक श्री. दिलीप वेल्हाणकर यांनी संघटनेचे विस्ताराबाबत प्रमुख मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन/मंच संचलन श्री. रविंद्र सहस्त्रबुद्धे नागपुर यांनी केले तर सर्व उपस्थित प्रतिनिधींचे व प्रमुख अतिथिंचे व प्रायोजकांचे आभार प्रदर्शन श्री. मिलिंद रेडे यांनी केले.

अधिवेशनात खालील कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. अध्यक्ष– श्री. दिलीप वेल्हाणकर, पुणे कार्याध्यक्ष श्री. मिलिंद रेडे, कल्याण उपाध्यक्ष श्रीमती संचिता दास, आगरतळा, त्रिपुरा सरचिटणीस शरद जाधव, पुणे, संघटनमंत्री– रविंद्र सहस्त्रबुद्धे, नागपुर, चिटणीस– संतोष साहु, जमशेदपूर कोषाध्यक्ष– विवेक पाटील, पुणे, अधिवेशनाची सांगता श्री. कुमार मिस्त्री यांच्या वंदेमातरम्‌ने झाली. अधिवेशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# पुसद येथे भव्य मेळावा संपन्न

**पुसद येथे** दिनांक १६/०२/२०२० रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचा यवतमाळ सर्कल मेळावा राजे विमल माधव मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. प्रथम दिप प्रज्वलन करून सर्कल मेळाव्याला सुरुवात झाली व झोन सचिव श्री. हेमंत मस्करे यांचे वडील यांचे ३/०२/२०२० रोजी निधन झाले त्यांना आदरांजली.





वाहिली मेळाव्याचे अध्यक्ष धुंडीराज बर्वे साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महाराष्ट्रचे अध्यक्ष जयप्रकाश होळीकर साहेब यांनी कामगारांचे पेट्रोल अलाऊन्स जीपीआरएस प्रणाली व रुपये ५००, तांत्रिक मुद्दा व क्लास ४ ते ३ टेक्निशिअन रुपांतर बाबत माहिती सांगितली. ओपीडीचा मुद्दा सर्व टेक्निशियननी उपस्थित केला. त्यावर सुद्धा सर्व माहिती सांगितली. तसेच हिंगमिरे साहेब उपमहामंत्री यांनी बदली धोरण संघटन यावर माहिती दिली व मुनीसाहेब यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. संघटन कसे असावे यावर माहिती दिली व राधेश्याम जयस्वाल सर्कल प्रसिद्धी प्रमुख यांनी सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबाबत अध्यक्षांना निवेदन दिले व स्वतःसुद्धा अध्यक्ष व उपमहामंत्री यांचे भाषणातून लक्ष वेधले. मस्करे साहेब झोन सचिव यांनी सुद्धा पगारवाढ देणगी मुद्दा मांडला. या विषयी मनोगत व्यक्त केले. राज्य संघटन कसे असावे व सोसायटीची माहिती दिली. कस्तुरे साहेब झोन उपाध्यक्ष यांनी सुद्धा संघटनेबद्दल माहिती दिली. श्री. दिघेवार साहेब, सर्कल अध्यक्ष यांनी संघटना अजून कशी वाढेल याकडे सर्वांचे लक्ष वेधले व आभार प्रदर्शन कलिम भाई झोन सहसचिव यांनी केले. सदावर्ते साहेब यांनी वंदे मातरम गीत सादर केले. २० सभासदांनी आज महाराष्ट्र वीज कामगार महासंघामध्ये प्रवेश घेतला.





# जागतिक महिला दिन विविध कार्यक्रम





**जागतिक महिला** दिनानिमित्त ८ मार्च २०२० रोजी म. वीज कामगार महासंघ, चंद्रपूर झोन महिलांच्यावतीने ऊर्जानगर येथे कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म. वी. कामगार महासंघाच्या पौर्णिमा पेंदोर होत्या. प्रमुख उपस्थिती भावना वनकर व वसंत काळे, उपमहामंत्री (नि) यांची होती.

महिला दिनानिमित्त सपना जांभुळे, संध्या बावलगे, रोहिणी कुरेकार, कल्पना डबरे, किरण उरकुडे, नंदा झाडे, पदमगिर वार यांनी मनोगत व्यक्त केले तर भावना वनकर यांनी आपण क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याकडून प्रेरणा घेऊन आता सर्वच क्षेत्रात महिला म्हणून अग्रेसर असल्याचे सांगितले. वसंत काळे, उपमहामंत्री यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगून शिवाजी महाराज, जिजाऊ माँसाहेबांमुळे घडल्याचे सांगताना सद्गुणांनी पूर्ण नारीची महानता सांगितली व महिलांनी पुढे व्हावे याकरिता संघटना पाठिंबा देईल, असा विश्वास दिला.

याप्रसंगी पतसंस्थेमध्ये बिनविरोध निवडून आल्याबद्दल भाग्यश्री वर्हेकर व सपना जांभुळे यांचा सत्कार करण्यात आला. पौर्णिमा पेंदोर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कविता राजूरकर व संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री वर्हेकर या दोन्ही महिला प्रतिनिधींनी केले. यावेळी अनेक महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेक भगिनींनी मदत केली.

## नाशिक झोन





**महाराष्ट्र वीज** कामगार महासंघाच्या रणरागिणी नाशिक परिमंडळमधील कार्यकर्त्या, सभासद यांची भव्य द्वारसभा संपन्न. यावेळी मा. मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांना महिलांच्या मुलभूत प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले व सखोल चर्चा दोन्ही दालनात झाली. अधीक्षक अभियंता यांनी सर्व कक्ष व उपकेंद्र, उपविभाग येथे पिण्याचे पाणी मिळण्याकरिता त्वरीत वर्क ऑर्डर काढावी, असे आदेश दिले. प्रसाधन गृहाबाबत ईई सिव्हील यांच्याशी बोलून आढावा घेतला, २१ प्रसाधन गृह १ महिन्यात तयार होत आहेत, असे सांगितले. तसेच महिलांच्या लहान पाल्यांकरीता सर्कल येथे हिरकणी कक्ष तयार करण्याचे आदेश दिले तसेच महासंघाच्या मागणीनुसार सर्व महिलांची दोन महिन्यात मिटींग घ्यावी, असे आदेश कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांना दिलेत. तसेच महिलांना ६.१५ नंतर थांबवू नये, असे देखील आदेश दिलेत. दोन्ही अधिकारी यांनी कामगार महासंघाच्या पदाधिकारी यांना भरभरून प्रतिसाद दिला.

इतर महत्त्वाच्या विषयांवर देखील साधक चर्चा झाली व महासंघाच्या पत्रातील सर्व विषय मार्गस्थ लावू असे आश्वासित केले.

# लातूर झोन





विश्व महिला दिनाचे औचित्य साधत आज लातूर सर्कलच्यावतीने महिला कर्मचाऱ्यांचा शुभेच्छा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास केंद्रीय महिला सदस्या श्रीमती अंजली पाटील मॅडम यांनी मार्गदर्शन केले. तसेच अलका मरे मॅडम व मयुरी नाईक मॅडम यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमास वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. महिलांच्या स्थानिक प्रश्नांचे निवेदन परिमंडळ कार्यालयास देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात व समारोप आनंदी वातावरणात झाली.

# काही क्षणचित्रे



शिरपूर- जळगाव झोन



शिरपूर- जळगाव झोन



मध्य प्रदेश



कोल्हापूर झोन

# काही क्षणचित्रे


नागपुर वितरण


नागपुर वितरण


नागपुर पारेषण


वाडा- कल्याण झोन

# संपर्क अभियान- नागपुर झोन वितरण





**दिनांक २०, २२/०२/२०२०** रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ नागपूर झोन अंतर्गत मौदा विभाग, नागपूर शहर प्रविभाग प्रकाश भवन, गड्डीगोदाम सदर नागपुर, काँग्रेसनगर विभागाअंतर्गत खरबी, बेसा, हुडकेश्वर, नरेंद्र नगर, भगवान नगर वितरण केंद्र येथे संपर्क अभियान अंतर्गत भेट देऊन सभासदांशी संवाद साधला तसेच पगारवाढ निधी संकलन, सभासद नोंदणी, नव वर्षाच्या शुभेच्छांसह श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रम तसेच विभागीय पदाधिकारी सोबत पगारवाढ निधी संकलन आढावा घेण्यात आला. संपर्क दौऱ्याला कामगार महासंघाचे प्रदेश सचिव श्री. सुनील बोक्षे, धर्मराज पाटणे, ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. राजेश पोफळी, पिरुसिंग राठोड, कमलेश मांडवगडे, वेदप्रकाश मिश्रा, विकास म्हसे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# संपर्क अभियान- वर्धा सर्कल- नागपुर झोन

**दिनांक २/०३/२०२०** रोजी नागपूर झोन अध्यक्ष श्री. खुशाल झाडे व श्री. आलोने साहेब यांनी हिंगणघाट येथे वेतन वाढ सभासद वर्गणी व सभासदांच्या विविध समस्या निवारण व २०२० संपर्क दौरा केला. ज्यामध्ये म. वीज कामगार महासंघाचे अनेक सभासदांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे प्रलंबित प्रश्न जाणून घेतले व वेतनवाढ पावती देण्यात आली.

त्याचप्रमाणे वर्धा मंडळ उपाध्यक्ष श्री. सचिन जाधव, विभागीय अध्यक्ष श्री. अनिल भोसले, सचिव श्री. दिलीप मेघरे, श्री. मोरे साहेब, श्री. संकेत नांदूरकर, श्री. अमित जुमडे, श्री. चंद्रशेखर वाघमारे, श्री. दिनेश बंडावार, श्री. जितेंद्र येसनकर इत्यादी अनेक सभासदांसोबत संपर्क दौरा पार पडला. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री पावडे साहेब यांची भेट घेऊन सभासदांच्या अनेक तक्रारीवर चर्चा करण्यात आली.

ज्यामध्ये कार्यकारी अभियंता श्री. पावडे साहेब यांनी स्पष्ट सांगितले की, कंत्राटी यंत्रचालक याला उपकेंद्रातील कोणतेही ३३ के. व्ही. किंवा ११ के. व्ही. लाईनवर चढू देऊ नये तसेच यंत्रचालक यांनी सुद्धा उपकेंद्रातील पॉवर, ट्रान्सफॉर्मर, ३३ के. व्ही. अप्पर बस इत्यादी धोक्याच्या ठिकाणी काम करू नये. तसेच पॅनलचे आत संपूर्ण माहितीशिवाय काम करू नये, त्याचप्रमाणे यंत्रचालक यांनी नियमित आवश्यक रेकॉर्ड मेंटेन्ड करावे. या व्यतिरिक्त काही आऊटेज घ्यायचे असल्यास संबंधित अधिकारी यांची अनुमती घेऊनच फिडर बंद करावे. तसेच कुठल्याही प्रकारे कामाचे फोटो ग्रुपवर अपलोड करणे आवश्यक नाही असे सांगितले.

तसेच आवश्यक वाटल्यास जनमित्रांनी विज बिल वसुलीसाठी संबंधित अधिकारी यांना सोबत घेण्याचे सुचविले तसेच जनमित्र व कार्यालयीन कर्मचारी यांचे टीए बील निकाली काढण्याचे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे ज्या उपकेंद्रात ३ यंत्रचालक कार्यरत आहे त्या उपकेंद्रातील ओटी बिल मिळण्यात येईल, असे कळविले. श्री. आलोने साहेब यांनी ज्या सभासदांची वेतनवाढ सभासद वर्गणी बाकी आहे त्यांनी ती त्वरित जमा करून संघटनेसोबत एकजूट राहण्याचे आव्हान केले.

# संपर्क अभियान- महानिर्मिती भुसावळ व पारस





**दिनाक १३/०२/२०२०** गुरुवार रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ भुसावळ (निर्मिती झोनची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस भुसावळचे (झोनचे अध्यक्ष) श्री. योगेश ढाके यांना अध्यक्षस्थान दिले. प्रमुख पाहुणे मा. श्री. शंकररावजी पहाडे साहेब (महामंत्री), म. वि. का. महासंघ (निर्मिती प्रभारी) श्री. रामदासजी माहुलकर साहेब, श्री. एम. डी. पाटील (उपाध्यक्ष) कामगार महासंघ, (निर्मिती कार्याध्यक्ष) श्री. विठ्ठलजी भालेरावजी, (निर्मिती उपमहामंत्री) श्री. वसंतरावजी काळेजी, श्री. संजय अमोदकरजी (सचिव निर्मिती), श्री. डी. के. झासकरजी (कार्य सदस्य निर्मिती) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

**बैठकीचे विषय :** १) बैठकीत संघटन वाढ २) नवीन वर्षात सभासद नोंदणी ३) सभासद संपर्क अभियान ४) २०२० वर्षात कार्यक्रम नियोजन.

बैठकीचे सूत्रसंचलन भुसावळ (झोन सचिव) अनंत जाधव यांनी केले. आभार श्री. सुनील पेढवी यांनी मानले. यावेळी सर्व झोन पदाधिकारी, सर्कल पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

**पारस :**

**दिनांक १२/०२/२०२०** रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाची पारस झोन (निर्मिती) झोन, सर्कल पदाधिकारी बैठकीचे अध्यक्ष श्री. सुनील मोरखडे हे होते. यावेळी प्रमुख उपस्थिती मा. श्री. शंकररावजी पहाडे महामंत्री म. वि. का. महा. कार्याध्यक्ष वसंतरावजी काळे, उपमहामंत्री, सुधाकर गुलहाने, हेमंत बंड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी निधीसंकलन व संघटना वाढ आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झोन सचिव रावसाहेब जाधव यांनी केले. सभासद उपस्थित होते.

# वर्धा सर्कल- नागपुर झोन

**महाराष्ट्र वीज** कामगार महासंघातर्फे दि. ०४/०३/२०२० ला वर्धा सर्कल अंतर्गत देवळी उपविभाग येथे संपर्क दौरा आयोजित करण्यात आला. यामध्ये सभासद नोंदणी, संपर्क अभियान कार्ड, महासंघ दिनदर्शिका व श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांचे जीवनावर आधारित पुस्तक सर्व सभासदांना देण्यात आले. तसेच सर्व सभासदांना पगारवाढ निधी पोटी पावती देऊन निधी संकलन करण्यात आले. या संपर्क व निधी संकलन दौऱ्यात नागपूर परिमंडळ अध्यक्ष खुशाल झाडे, वर्धा विभागीय पदाधिकारी राकेश ठाकरे, देवळी उपविभागीय अधिकारी निरज काकडे, अक्षय कडू, मुजफ्फर शेख, सचिन ठाकरे, अण्णा नानवर, नितीन सावरकर, जितेंद्र अतागे, बलदेव साहू, पृथ्वी बेलगे इ. पदाधिकारी सभासद उपस्थित होते.



# कोराडी





महाराष्ट्र वीज कामगार महासंघाची महत्त्वपूर्ण बैठक कोराडी कार्यालयात संपन्न झाली. बैठकीला महासंघाचे महामंत्री श्री. शंकरराव पहाडे साहेब, कार्याध्यक्ष श्री. विठ्ठल भालेराव, उपमहामंत्री वसंत काळे, बंडू पिंपलशेंडे (चंद्रपूर), श्री. बंड (पारस), श्री. विलास भालेराव, गणपती जगताप, ज्ञानेश्वर चरपे, धनंजय दाणी, निलेश चरखे यांचेसह सभासद उपस्थित होते. बैठकीमध्ये सभासद नोंदणी आढावा, पगारवाढ निधी, कल्याण निधी, मेडिक्लेमसह वेळेवर येणाऱ्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली. संचालन चरपे यांनी तर आभार चरखे यांनी मानले.

# संपर्क अभियान- पुणे झोन- पिंपरी विभाग

**महाराष्ट्र वीज** कामगार महासंघाचे पिंपरी विभागात संपर्क अभियान यशस्वीपणे संपन्न झाले. सदर अभियानात १७ व १८ फेब्रुवारी या दोन दिवसांत जवळपास १०० सभासदांशी प्रत्यक्ष संपर्क झाला.

खालील विषयांवर चर्चा झाली. १) श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी जन्मशताब्दी वर्ष नोव्हें. २०१९ ते डिसें. २०२०. २) कामगार महासंघाचा इतिहास ३) पगारवाढ व पगारवाढ देणगी ४) रिस्ट्रक्चरिंगबाबत ५० आगामी काळातील आव्हाने. ६) सभासदांचे प्रश्न व अडचणी. अभियानात प्रदेश, झोन, सर्कल तसेच पिंपरी विभागातील सर्व पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे हार्दिक आभार.







# संपर्क अभियान- परळी पॉवर स्टेशन






**परळी वैजनाथ** निर्मिती संपर्क दौरा दिनांक ०७/०३/२०२० गुरुवार रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ परळी वैजनाथ (निर्मिती झोन) ची बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस केंद्रीय उपाध्यक्ष मा. श्री. संभाजीराव मुंडे यांना अध्यक्षस्थान दिले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. श्री. शंकररावजी पहाडे साहेब (महामंत्री), म. वि. का. महासंघ, श्री. रामदासजी माहुलकर साहेब (निर्मिती प्रभारी), श्री. विठ्ठलजी हे उपस्थित होते.

# संपर्क अभियान- पारेषण झोन अमरावती व नागपूर झोन





# संपर्क अभियान- पारेषण झोन अमरावती व नागपूर झोन






संपर्क अभियान- पारेषण झोन अमरावती व नागपूर झोन






चंद्रपुर

## हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!







# आंदोलनाचा इशारा आणि नियमबाह्य दंड रद्द

**औरंगाबाद : ०२/०५/२०२०** रोजी ०४:०० वाजता मा. कार्यकारी अभियंता (शहर विभाग क्र.१ औरंगाबाद) यांनी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने दिनांक २५/०२/२०२० रोजी दिलेल्या आंदोलन नोटीसच्या अनुषंगाने बैठकीस विभागीय पदाधिकारी यांना चर्चे करिता पाचारण केले होते त्या अनुषंगाने प्रशासनाकडून मा. कार्यकारी अभियंता श्री. राजपूत साहेब, श्री. विश्वास पाटील साहेब (उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी औरंगाबाद परिमंडळ) व श्री. जाधव साहेब (प्र. उपव्यवस्थापक) यांच्या सह महासंघातर्फे मी स्वतः कृष्णा ताडे (विभागीय सचिव) महाराष्ट्र वीज कामगार महासंघ शहर विभाग क्र.१, तसेच माझ्या सोबत श्री. गणेश दाभाडे (मंडळ सचिव) महाराष्ट्र वीज कामगार महासंघ हे उपस्थित होते यावेळी प्रशासना सोबत सकारात्मक चर्चा करण्यात आली व झालेली कारवाई ही अन्यायकारक आहे यास त्यांनी दुजोरा दिला व तसे संकेतही दिले त्यावेळी महासंघाने ही कारवाई मागे घ्यावी अशी आग्रही मागणी केली त्यावेळी साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद देत काही सिस्टीम मधील अडचणीमुळे कपात झालेला दंड हा रद्द करता येत नसल्याने व तशी सुविधा प्रणालीमध्ये नसल्याने त्यास आपिल हाच पर्याय असतो म्हणून आपल्या सर्व जनमित्रांनी याबाबत अपील सादर करावे मी ते स्वतः निर्णायकी करून मंजूर करील हे सकारात्मक अभिवचन श्री . राजपूत साहेब यांनी दिले तसेच त्या सोबत सहकार्याची अपेक्षा संघटनेकडून व्यक्त केली त्यावेळी महासंघ म्हणून त्याना सुद्धा आश्वस्त करण्यात आले की महासंघ ही संघटना अतिशय संस्कारित संघटना आहे व श्रम ही आराधना हे आमचे ब्रीद आहे तसेच देश हित ,उद्योगहित,श्रमिकहित जोपासणारे संघटन आहे त्यामुळे महासंघ ही संघटना व आमचे कर्मचारी बांधव जिवाचं रान करून काम करत असतात याची आपणासही जाणीव आहेच करिता ही कारवाई आपण आश्वासनं दिल्याप्रमाणे अपीलमध्ये का होईना पण सर्व जनमित्रांना यात न्याय द्यावा व तत्काळ हे अपील सकारात्मक व



निर्दोष करून निकाली काढावे अशी विनंती केली. यावर महासंघास लिखित स्वरूपात पत्र देऊन १० दिवसात अपील एकत्रित व सकारात्मक पद्धतीने निकाली काढले जातील व सर्वांना न्याय दिला जाईल याची ग्वाही दिली. यास संघटनेकडून सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र वीज कामगार महासंघ म्हणून आपण आपले असहकार आंदोलन तात्पुरते स्थगित करत आहोत करिता आपापले सिम कार्ड आपण सर्वांनी परत घ्यावेत व कंपनीने दिलेले काम व उद्दिष्ट पूर्णपणाने साध्य करण्याचा प्रयत्न करावा व कंपनीचा व आपल्या विभागाचा उपविभागाचा लौकिक वाढवावा. सर्व कर्मचारी हे पूर्ण क्षमतेने आपापले काम करतील असा विश्वास साहेबांना देण्यात आला या सर्व प्रक्रियेत श्री. अरुण पिवळ साहेब (कार्याध्यक्ष प्रदेश, महावितरण), श्री. तुषार भोसले साहेब (झोनल अध्यक्ष) तसेच श्री. वाल्मीक निकम साहेब (झोनल सचिव) यांचे मार्गदर्शन मिळाले तसेच या कामी सक्रिय सहभाग नोंदवलेल्या सर्व सभासद पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांचे विशेष आभार. याच पद्धतीने अन्याया विरूद्ध तसेच कंपनीच्या कामकाजात एकत्र टीम वर्कने काम करा महाराष्ट्र वीज कामगार महसंघाचा विजय असो.

## श्रीराम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा!!

# म.वीज कामगार महासंघ पैठण उपविभागीय बैठक व भव्य प्रवेश सोहळा



**दिनांक २३/२/२०२०** रोजी संत एकनाथ महाराजांच्या पावन भूमीत पैठण येथे म. वीज कामगार महासंघाच्या विचारसरणीने, अभ्यासू, अनुभवी नेत्रुत्व व कार्यशैलीने प्रेरित होऊन म. वीज कामगार महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष (वितरण) मा. अरूणजी पिवळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महावितरणचे क्रिकेटपटू व लाइनस्टाफ पैठण एक्स्प्रेस श्री. पांडुरंग धांडे, श्री. कैलास नेमाने यांच्यासह त्यांच्या एकूण २५ लाइनस्टाफ बांधव सहकाऱ्यांनी इतर संघटनेतून म. वीज कामगार महासंघात जाहीर प्रवेश केला .

सर्व नवागत सभासदांचे कार्याध्यक्ष मा. अरुणजी पिवळ साहेब व संघटनेचे प्रमुख मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते गुलाबपुष्प, पुष्पहार, महासंघाची पॉकेट डायरी देवून प्रवेश व सत्कार करण्यात आला.

जाहीर प्रवेश केलेल्या सभासदांची नावे पुढीलप्रमाणे –सर्वश्री १) शिवनाथ घटे २)दिपक कचरे ३)दिपक वाघमारे ४)पांडुरंग धांडे ५)कैलास नेमाने ६)सुनील टकले ७)संभाजी धरम ८)दिपक मुळे ९) एकनाथ बांगर १०) राधेश्याम सोलाटे ११) मनोज वाबळे १२) गौतम नरवडे १३) गोपाळ लूचारे १४) रवी झारगड १५) ज्ञानेश्वर पानखडे १६) उद्धव ढेरे १७) एस. एस. मुळे १८) आर. टी. गल्धर १९) वैभव साखरे २०) अमोल निकम २१) अमोल बांगर २२) सुमीत धोक्टे २३) दीपक सोनकांबळे २४) योगेश फूके २५) सचिन देवरे

याप्रसंगी पैठण उपविभागीय संपर्क अभियाना अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छ. शिवाजी महाराज व संत गाडगेमहाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली व नंतर श्रमिक गीत घेण्यात आले व नंतर अतिथिंचे स्वागत करण्यात आले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री. प्रेमसिंग डोभाळ (ग्रा. सर्कल अध्यक्ष) हे होते. तसेच कार्याध्यक्ष मा. अरूणजी पिवळ साहेब यांच्यासह औरंगाबाद झोनचे झोनल अध्यक्ष मा. श्री तुषारजी भोसले साहेब, झोनल सचिव मा. वाल्मिक निकम साहेब, झोनल उपाध्यक्ष श्री. जैवळ साहेब, झोनल प्रभारी श्री. बापू शिंदे साहेब, झोनल संघटनमंत्री श्री. डी. बी. हातकंगने साहेब, झोनल प्रसिध्दीप्रमुख श्री. सतूके साहेब, ग्रामीण सर्कल सचिव श्री. नितीनजी गरुड साहेब, सहसचिव श्री. नितीन खाजेकर साहेब, प्रसिद्धीप्रमुख रोडगे साहेब, संघटनमंत्री कैलास शेळके साहेब , औरंगाबाद ग्रामीण विभाग १ चे विभागीय अध्यक्ष श्री. निलेश पवार साहेब, विभागीय सचिव श्री. शंकर गाढेकर साहेब विभागीय संघटनमंत्री श्री. किशोर साळवे साहेब, विभागीय कोषाध्यक्ष श्री. ईश्वर मुळे साहेब, शहर मंडळ सचिव श्री. गणेश दाभाडे साहेब, सहसचिव श्री. अनिल घोगरे साहेब, शहर विभाग १ चे विभागीय अध्यक्ष श्री. कृष्णा ताडे साहेब, ग्रामीण विभाग २ चे विभागीय उपाध्यक्ष श्री. कैलास काळे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती .

याप्रसंगी कार्याध्यक्ष मा.श्री. अरूणजी पिवळ साहेब यांनी नवागत सभासदांच्या स्वागतपर मनोगतातून विस्तृत असे मार्गदर्शन केले .संघटनेची कार्यशैली, इतिहास व पगारवाढीतील संघटनेची भूमिका व यश याबद्दल विशेष माहिती सांगितली व कामगार महासंघ सदैव आपल्या पाठीशी उभा राहील अशी ग्वाही दिली.

तसेच याप्रसंगी झोनल अध्यक्ष श्री. तुषारजी भोसले साहेब यांनी मार्गदर्शन करतांना केडरवादाचे दुष्परिणाम सर्वांना समजाऊन सांगितले व एकीचे बळच सर्वश्रेष्ठ आहे असा मौलिक सल्ला दिला.

तसेच झोनल सचिव वाल्मिक निकम साहेब, झोनल संघटनमंत्री श्री. हातकंगने साहेब, उपाध्यक्ष जैवळ साहेब, ग्रामीण सर्कल सचिव श्री. गरुड साहेब यांनीही बैठकीतील उपस्थित कामगार बंधुंना योग्य मार्गदर्शन केले व सर्वांनी कार्यप्रेरित होण्याचे आवाहन केले.

प्रसंगी नवागत सभासदांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आम्ही एका चांगल्या व आदर्श कुटुंबात आलो व योग्य ठिकाणी आलो याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे व निस्वार्थी भावनेने आणि कुठलीही मागणी वा हेतू, अभिलाषा न बाळगता आम्ही या संघटनेत प्रवेश करीत आहोत अशा आपल्या भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पैठण उपविभागातील संघटनेचे जेष्ठ सभासद श्री. खरात साहेब, श्री. टेके साहेब, श्री. भुजबळ साहेब, गोर्डे साहेब, सोनवणे साहेब, ढवळे साहेब, तीत्तर पाटील, भावले साहेब, धरम साहेब, पानखडे साहेब, दीपक वाघमारे साहेब, कचरे साहेब, राऊत साहेब, घोगरे साहेब, घोंगडे साहेब आदींनी परिश्रम घेतले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. किशोर साळवे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. टेके साहेब यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

**विद्युत्त क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे तदफदार नेतृत्व श्री. राम हरी खंदारे सीनियर टेक्नीशियन उपविभाग महागाव यांनी महाराष्ट्र विज कामगार संघटनेचे पुसद विभागीय उपाध्यक्ष श्री. तेजस आबाले प्रिशिपल टेक्निशियन व श्री. साहेबराव अबोरे यांच्या उपस्थित आज महाराष्ट्र विज कामगार महासंघ या बलाढ्य संघटनेमध्ये जाहिर प्रवेश केला. या वेळी झोन अध्यक्ष श्री दिलीप राजे उपस्थित होते**






सदाशिव हनमंतराव राजुरे वरीष्ठ तंत्रज्ञ पालम यांचे महाराष्ट्र वीज कामगार महासंघ नांदेड यांचा प्रवेश सोहळा सर्कल सचिव जे. आर लेंडेवाड व विभागीय सचिव शहर नांदेड व गिरीष डोणगावकर गिरीष (नेते) संदीप व्यवहारे, पवार साहेब, लंवगे साहेब यांच्या उपस्थीतीत पुष्पगुच्छ देवून रीतसर सभासद पावती फाडून प्रवेश करून घेतला. संघटनेत राजुरे साहेब यांनी प्रवेश घेतल्या बद्दल हार्दीक हार्दीक अभिनंदन

## महामंत्री श्री. शंकर पहाडे यांचे निवेदन

**संपूर्ण जगात कोरोना या आजाराने थैमान घातले आहे. हा आजार कमालीचा संसर्गजन्य असल्याने सर्वांनीच काळजी घेण्याची गरज आहे. एकमेकांच्या संपर्कात आल्याने हा आजार वेगाने पसरण्याची शक्यता असल्याने केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने सर्वांना आवाहन केले आहे की काही दिवस सेमिनार, वर्कशॉप, सभा आदी घेऊ नये.**

**सर्वांचे आरोग्यहित लक्षात घेऊन या आवाहनास प्रतिसाद म्हणून महाराष्ट्र वीज कमगार महासंघाची दि. १४ व १५ मार्च २०२० रोजी त्र्यंबकेश्वर येथे आयोजित केलेली केंद्रीय कार्यसमिती बैठक रद्द केली असून, पुढील तारीख नंतर कळवण्यात येईल.**

**तसेच महासंघाच्या सर्व सदस्यांनी या काळात कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी शासनाला सर्वोतोपरी सहकार्य करावे.**

अत्यावश्यक सेवेतील तांत्रिक कामगार आपला जीव धोक्यात घालून देत असलेल्या सेवेबद्दल कामगार महासंघ सदैव त्यांचा ऋणी राहील.

# श्रद्धांजली



- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या महावितरण कंपनीचे उपाध्यक्ष श्री. अशोक जाचक यांच्या मातोश्री श्रीमती सुमन जाचक यांचे दि. २५ फेब्रुवारी २०२० रोजी भिगवण (पुणे) येथे त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. श्री. अशोक जाचक यांना कार्यकर्ता घडवण्यात त्यांच्या संस्कारांचा मोठा हात होता. त्यांच्या निधनामुळे जाचक परिवाराचा आधारवड कोसळला आहे.



- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे सांगली मंडल अध्यक्ष श्री. विठ्ठल आत्माराम माने यांचे अल्पशा आजाराने दि. १० मार्च २०२० रोजी अकाली दुःखद निधन झाले.
- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व भांडार विभागातून भांडार अधिकारी म्हणून निवृत्त झालेले श्री. जॉन वामन पाठारे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन.
- महाराष्ट्र वीज कामगार संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. सुभाष जगदाळे यांचे थोरले बंधु श्री. बाळकृष्ण धर्मराज जगदाळे यांचे दुःखद निधन.
- श्री. सुभाष धर्मराज जगदाळे यांच्या वहिनी सौ. कमल विष्णु जगदाळे यांचे दुःखद निधन.
- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे कार्यकर्ते व निवृत्त उप व्यवस्थापक (मासं) श्री. अशोक मुत्थीयाल यांच्या मातोश्री श्रीमती कमलबाई मुत्थीयाल यांचे दि. ११ मार्च २०२० रोजी दुःखद निधन.
- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व लातुर झोनचे माजी अध्यक्ष श्री. एस. एन. गोडसे, सेवानिवृत्त लेखाधिकारी उस्मानाबाद यांच्या पत्नी सौ. अलका शहाजी गोडसे यांचे कळंब (उस्मानाबाद) येथे दुःखद निधन.

# विकासाची दृष्टी नसलेले महाविकास आघाडी सरकार

## रोखठोक



**– विलास झोडगेकर**

२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ज्या पक्षांना जनतेने नाकारले. त्यांना जनतेने युतीच्या माध्यमातून स्वीकारलेल्या एका पक्षाने युती धर्म मोडून मुख्यमंत्रीपदासाठी जाऊन मिळाला. अशा सत्तेसाठी एकत्रित आलेल्या पक्षांनी आपल्या एकत्रिकरणाला महाविकास आघाडी असे नाव दिले व गेल्या सुमारे १०० दिवसांपासून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आहे.

तीन– साडेतीन महिन्यांपूर्वी महाराष्ट्रातील राजकीय सारीपाट हा एखाद्या सस्पेन्स सिनेमापेक्षाही जास्त रहस्यमय होता. ज्या जनतेने सरकार निवडण्यासाठी मतदान केले होते ती जनता अक्षरशः श्वास रोखून हा घटनाक्रम न्याहाळीत होती. शेवटपर्यंत त्यांना खात्री वाटत होती की सर्व काही व्यवस्थित होईल आणि जो आपल्या मनातील मुख्यमंत्री आहे तोच शपथ घेईल आणि खरच झालेही तसेच! भल्या पहाटेच ब्रेकिंग न्युज झळकली. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर अजित दादांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. नैतिक– अनैतिक, शक्य– अशक्य, टिकाऊ–विकाऊ असा काहीही विचार न करता देवेंद्रजींच्या चाहत्यांनी आनंदोत्सव साजरा करायला सुरुवात केली. परंतु ज्यांच्यावर विश्वास ठेऊन त्यांनी सरकार स्थापन केले होते त्यांनी कच खाल्ली आणि माघारी परत गेले आणि साडेतीन दिवसांचे सरकार विधानसभेचे तोंड न पाहाता कोसळले. अर्थात या सस्पेन्स पिक्चरमधील गुढ अद्याप कायम आहे. ते म्हणजे अजित दादांच्या भूमिकेचे! ते खरच देवेंद्रजींसोबत आले होते की त्यांना पाठविण्यात आले होते. सर्व खेळ आधीच ठरला होता व त्यानुसार केवळ दिखावा निर्माण केला की बंड अयशस्वी होत आहे हे लक्षात आल्यावर एक युद्धनिती म्हणून माघार! की पश्चाताप! हे अद्याप गुढच आहे. परवा विधानसभेत दुसऱ्या दादांनी अर्थात चंद्रकांत दादांनी पहिल्या दादांना डिवचून बोलायला भाग पाडले होते. परंतु देवेंद्रजींनी दादांना गप्प राहण्याचा सल्ला दिला. आणि दादांनी चक्क तो मानला. त्यामुळे गुढ उकलले तर नाहीच उलट ते अधिक गडद झाले. नवा प्रश्न निर्माण झाला. दादा नेमके कोणाचे ऐकतात? काकांचे की देवेंद्रजींचे! की दोघांचेही नाही! असो! दादांची भूमिका हा काही आजच्या 'रोखठोक'चा विषय नाही! तसेच देवेंद्रजींनी स्वतःची अशी फजिती का करून घेतली हे गुढ सुद्धा उलगडायचं बाकी असले तरी तोही या रोखठोकचा विषय नाही. विषय आहे महाविकास आघाडीच्या अजेंड्यांचा!

हे तर स्वाभाविकच आहे की आघाडी सरकार म्हटलं की तडजोड ही आलीच! खर तर अशा सरकारांना आघाडी किंवा युतीचे सरकार म्हणण्या ऐवजी तडजोडीचे सरकार असेच म्हटले पाहिजे. त्यातूनही परस्पर विरुद्ध विचारसरणी असेल तर खूपच अवघड असते कोणताही निर्णय हा मुख्यमंत्र्यांना विनासहमती घेता येत नाही. त्यामुळे निर्णय घेऊन वाद वाढवण्यापेक्षा निर्णयच न घेणे हे अशा सरकारचे वैशिष्ट्य असते. महाविकास आघाडीचे सरकार हे अशा पक्षांचे आहे की ज्या पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. त्या पक्षाची निदान मुख्यमंत्रीपदाची शपथ घेईपर्यंत तरी ओळख ही कट्टर हिंदुत्ववादी अशीच होती. उलट अन्य जे दोन पक्ष आहेत त्यांची ओळख वरवर जरी सेक्युलर किंवा सर्व धर्म समभाव अशी असली तरी त्यांचे अंतरंग मात्र हिंदुविरोधी असल्याने भाजपा नेहमी शिवसेनेला डिवचत असते व त्यांच्या हिंदुत्वाची आठवण करून देत असते. हेतु हाच की हे सरकार पडावे आणि सेनेच्या मदतीने आपलं सरकार बनावं! परंतु देवेंद्रजींना हे माहिती नाही की या सरकारमधील घटक पक्षांमध्ये कितीही वैचारीक मतभेद असले तरी एका गोष्टीवर त्यांचे मतैक्य आहे ते म्हणजे 'भाजप विरोध' आणि 'फडणवीस विरोध' खर खोट देव जाणे. परंतु फडणवीसांना बदलायला जर मोदीजी तयार झाले असते तर राष्ट्रवादीच्या मदतीने भाजपा सरकार सत्तेवर आले असते! सांगायचा मुद्दा इतकाच की तूर्त तरी या सरकारला धोका आहे असे दिसत नाही.

महाराष्ट्रातील सरकारच्या आघाडीचे नाव जरी महाविकास आघाडी असे असले तरी विकासाचा आणि या सरकारचा काही संबंध आहे असे वाटत नाही. या सरकारचा किमान समान कार्यक्रम काय आहे हे जनतेला माहित नाही. घटक पक्षातील मंत्र्यांना, आमदारांना तरी माहित आहे का नाही अशी शंका यावी असेच सध्याचे वातावरण आहे. कारण या सरकारने पहिल्या १०० दिवसांत अनेक निर्णय घेतले परंतु ते विकासाला चालना देणारे नसून आधीच्या सरकारने विकासाला गती देण्यासाठी ज्या योजना सुरू केल्या होत्या त्या रद्द करण्याचे काम या सरकारने केले. उदा. मेट्रो कारशेड, मेट्रो प्रकल्पाचा फेर आढावा. जलयुक्त शिवार योजना, थेट सरपंच व नगराध्यक्ष निवड, महानगरपालिका प्रभाग पद्धत, नाणार प्रकल्प आदी थोडक्यात सांगायचे तर फडणवीस सरकारने ज्यामध्ये शिवसेना सहभागी होती. गेल्या ५ वर्षांत जे निर्णय घेतले ते या सरकारने आपल्या पहिल्या १०० दिवसांत रद्द केले.

आधीच्या सरकारच्या कामाचा आढावा घेण्याचा पूर्ण अधिकार नव्या सरकारला आहे. त्यामुळे नव्या सरकारने अनेक योजना रद्द केल्या याबद्दल आम्हाला काही म्हणायचे नाही. परंतु नव्या सरकारचा अजेंडा आहे तरी काय ते तरी निदान स्पष्ट व्हायला हवे. कोरेगाव-भिमा प्रकरणाची फेर चौकशी कोणाच्याच जाहिरनाम्यात नव्हती परंतु केवळ पवारांची इच्छा म्हणून तो विषय पुढे आला आणि त्या विषयाभोवतीच सरकार अनेक दिवस फिरत राहिले.

नव्या सरकारचा अजेंडा असायला हवा होता. सातबारा कोरा करणे, अवकाळी पावसाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपयांची मदत करणे, मराठवाड्याची पाणी समस्या दूर करणे, भूमिपुत्रांना रोजगार देणे, महिलांवर होत असलेले अत्याचार थांबवणे, कायदा व सुव्यवस्था चुस्त-दुरुस्त करणे, विदर्भ व मराठवाड्याच्या विकासाला गती देणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे, बच्चु कडु यांच्या कल्पनेतील जो शेवटचा माणुस आहे त्याला आर्थिकदृष्ट्या शक्ती देणे, राजु शेट्टी यांच्या मनातील शेतकऱ्यांना न्याय देणे. दुर्दैवाने यातील एकाही मुद्याची चर्चा होत नाही. मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यावर पहिले काम केले ते आरेतील कारशेडचे काम थांबवणे आणि मुंबई मेट्रोचा फेर आढावा घेणे म्हणजेच विकासाला खिळ घालणे. मंत्रिमडळाच्या विस्तारानंतर लगेच निर्णय घेतला. तो मुंबई रात्री सुद्धा जागी ठेवण्याचा म्हणजे कायदा सुव्यवस्थेवरचा ताण वाढवणे. बारामतीकडे जाणारे पाणी आधीच्या सरकारने रोखले होते ते पुन्हा सुर झाले. सरकारी कर्मचारी विशेषतः मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना खुश करण्यासाठी ५ दिवसांचा आठवडा करण्यात आला त्यावर अनेक मंत्र्यांनीच टिका केली! म्हणजे जे विषय निवडणुक प्रचारात नव्हते त्यांना प्राधान्य देण्यात येत आहे.

या सरकारने सादर केलेले पहिले बजेट हे 'येरे माझ्या मागल्या' या म्हणीचा संकेत देणारे आहे. कारण पुन्हा एकदा पश्चिम महाराष्ट्रालाच झुकते माप दिले आहे. विदर्भाला जास्त तर काही दिले नाही उलट जे पूर्वी दिले होते त्यातही कपात केली आहे. उत्तर महाराष्ट्र तर या सरकारच्या नकाशातच नाही आणि त्यामुळे जितक्या दिवस सत्ता राहील तितका पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत इतर विभाग मागे पडणार हे निश्चित.

युतीचे असो, आघाडीचे असो की एका पक्षाचे असो धोरणात्मक निर्णय हे मुख्यमंत्र्यांच्या अनुमतीशिवाय घेतले जात नाही व साधारणपणे मुख्यमंत्रीच ते जाहिर करित असतात. परंतु या सरकारचे तसे नाही. निर्णय त्या त्या खात्याचे मंत्री घेतात व ते जाहिरही करतात. त्यानंतर ते मुख्यमंत्र्यांना कळतात. प्रत्येकाला १०० युनिट फुकट वीज देण्याचा मनोदय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना विश्वासात न घेताच उर्जामंत्री नितीन राऊत यांनी जाहीर केला. त्याला मुख्यमंत्र्यांनी नव्हे तर अजित दादांनी आक्षेप घेतला. महावितरण आधीच आर्थिक संकटांना तोंड देत असतांना आणि वीज दरवीढाचा प्रस्ताव सादर केलेला असतांना त्या खात्याचे मंत्री मात्र १०० युनिट सरसकट मोफत देण्याचा मनोदय जाहीर करतात ही खरी गंमत आहे. दुसरा निर्णय तर यापेक्षा भारी आहे. मुस्लीमांना आरक्षण देण्यास सरकार कटीबद्ध आहे अशी घोषणा श्री. नबाब मलीक यांनी चक्क विधानपरिषदेत केली त्यावर बरीच टिका झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी सांगितले की हा विषय सरकारपुढे अद्याप चर्चेलाच आलेला नाही. अजित दादांनी सुद्धा मुख्यमंत्री म्हणतात तेच बरोबर आहे असे सांगितले. जो विषय अद्याप मंत्रीमंडळापुढे आलेलाच नाही त्यावर सरकार आरक्षण देण्यास कटीबद्ध आहे हे विधीमंडळात सांगितले कसे जाऊ शकते? असा सवाल एकाही वृत्त वाहिनीने उपस्थित केला नाही. प्रसार माध्यमांचा या सरकारला असलेला पाठिंबा हीच या सरकारची खरी ताकद आहे. प्रसार माध्यमांना भाजपाचे सरकार कुठेच नको आहे. भाजपा सोडून कोणत्याही सरकारला प्रसार माध्यमांचा पाठिंबा आहे. मग ते केजरीवाल असो, ममता असो, कमलनाथ असोत की गहेलोत असोत. आणि यात नजिकच्या भविष्याकाळात काही बदल होईल याची शक्यता नाही. यामुळे या सरकारने काहीही निर्णय घेतले नाही तरी प्रसार माध्यमांकडून त्यांच्यावर टिका होणार नाही. एरवी उद्धव ठाकरे एवढा गाजावाजा करीत अयोध्येला गेले असते तर प्रसार माध्यमांनी टिकेची झोड उठवली असती. परंतु आता तसे झाले नाही कारण त्यांची अयोध्याभेट ही धार्मिक नव्हती तर भाजपाला डिवचण्यासाठी होती. त्यामुळे मिडीयाने उत्साहाने या भेटीचे रसभरीत वृत्तांकन केले. आणि भाजपाच्या वाचाळ नेत्यांची खिल्ली उडवली.

जोपर्यंत या आघाडी सरकारच्या पाठीशी मिडीया भक्कमपणे उभा आहे आणि आघाडीतील सर्व घटक पक्षांचा भाजपद्वेष कायम आहे. तोपर्यंत हे सरकार स्थिर आहे. त्यांना घाबरण्याचे काहीही कारण नाही आणि काही नाही केले तरी सरकारला धोका नाही म्हटल्यावर प्रत्यक्ष विकास करण्याची काहीही गरज नाही. नावामध्ये विकास आहे एवढे पुरेसे आहे.

एका गोष्टीचे मात्र आश्चर्य वाटते की, जुन्या सरकारचे सर्व निर्णय रद्द केले जात असतांना त्या सरकारने घेतलेला एक निर्णय मात्र या सरकारने नुसता कायमच ठेवला असे नाही तर विरोधी पक्षात असतांना जे या निर्णयाला विरोध करीत होते तेच नव्या मंत्रिमंडळाचे सदस्य झाल्यावर त्या निर्णयाची तातडीने अंमलबजाणी केली तो म्हणजे मालेगाव, मुंब्रा, शिळ व कळवा या विभाग उपविभागांना फ्रांचायझीच्या ताब्यात देणे.

भाजपाची सत्ता गेल्यावर आनंदोत्सव साजरा करणाऱ्या डाव्यांना मात्र आता भाषणात काय बोलावे? असा प्रश्न निर्माण झाला आहे? सध्या तरी असेच म्हणावे लागेल की विकासाशी काहीही देणे घेणे नसलेली ही महाविकास आघाडी आहे.

# महाराष्ट्र वीज कामगार महासंघ महापारेषण वार्ताफलकाचे अनावरण





**औरंगाबाद दि २४/०२/२०२०** मा. मुख्य अभियंता श्री. वाळके साहेब यांच्या अध्यक्षतेत पारेषण परिमंडळ कार्यालय औरंगाबाद येथे सन्माननीय उपमहामंत्री पारेषण श्री. दंडारे साहेब यांच्या हस्ते कामगार महासंघाच्या वार्ता फलकाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी उपमहामंत्री पारेषण यांनी उद्‌बोधन केले. वार्ताफलकाचे महत्व, संघटनेचे ध्येय, धोरण व विशेषता तसेच वेतनवाढ निधी संकलन आणि महाराष्ट्र वीज कामगार महासंघ अधिक सक्षम करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. वाळके साहेब यांनी महाराष्ट्र वीज कामगार महासंघास शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

श्री. अरुण पिवळ साहेब, कार्याध्यक्ष महावितरण, अभिजित धर्माधिकारी साहेब, सुहास निकम झोन अध्यक्ष, वाल्मीक निकम सचिव, अविनाश जोशी साहेब, आशिष जोशी साहेब, एस ई ए चे पदाधिकारी तसेच काटे साहेब, कांबळे साहेब कार्यकारी अभियंता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सर्व पदाधिकारी सभासद कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्व अधिकारी प्रमुख पाहुणे पदाधिकारी तसेच सभासदांनी बहुसंख्येने हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली त्या बद्दल सर्वांचे औरंगाबाद परिमंडळातर्फे सर्वांचे आभार. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन धर्माधिकारी साहेब तसेच सुनील राऊत यांनी आभार व्यक्त केले

# महाराष्ट्र वीज कामगार महासंघ महापारेषण- बीड





**बीड दि २५/०२/२०२०** अउदा संवसू विभाग मा. कार्यकारी अभियंता श्री. जायभाय साहेब यांच्या अध्यक्षतेत सन्माननीय उपमहामंत्री पारेषण श्री. दंडारे साहेब यांच्या हस्ते कामगार महासंघाच्या वार्ता फलकाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी उपमहामंत्री पारेषण यांनी मार्गदर्शन केले. वार्ताफलकाचे महत्व, संघटनेची विशेषता तसेच वेतनवाढ निधी संकलन आणि महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व कार्यकर्ता याबाबत माहिती दिली व कामगार महासंघ अधिक सक्षम करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी अभियंता श्री. जायभाय् साहेब यांनी महाराष्ट्र वीज कामगार महासंघास शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

श्री सुरेश गायकवाड उपव्यवस्थापक (मास) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. अभिजित धर्माधिकारी साहेब, राज्य सचिव, सुहास निकम झोन अध्यक्ष, श्री. सुनिल राऊत सर्कल सचिव, श्री . राहुल कुलकर्णी विभागीय सचिव प्रामुख्याने उपस्थित होते. अधिकारी प्रमुख पाहुणे पदाधिकारी तसेच सभासद बहुसंख्येने हजर होते. त्या बद्दल सर्वांचे बीड विभाग तर्फे सर्वांचे आभार. श्री. राहुल कुलकर्णी, श्री बाळासाहेब नागटीळे, श्री. योगेश कुलकर्णी, श्री . प्रविण शेंडे, श्री. वैभव कुलकर्णी, श्री. गोपाल कड, श्री. संजीव मुंडे, श्री. सी. व्ही. खुणे, श्री . विकी डोंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. नागटिळे यांनी तर श्री. राहुल कुलकर्णी यांनी आभार मानले.

# वार्तांफलक अनावरण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

**प्रशिक्षण केंद्र नाशिक, दि. ६-३-२०२०**

दि. ६ मार्च २०२० रोजी एकलहरे नाशिक येथील महावितरणच्या प्रशिक्षण केंद्रात महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या नुतन वार्तांफलकाचे अनावरण नाशिक झोनमधील तिनही कंपनी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# थोडक्यात महत्त्वाचे

## आढावा बैठक- सोलापुर

**महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सोलापूर** : दि.१ मार्च २०२० रोजी शांती सागर मंगल कार्यालय येथे उपमहामंत्री वितरण श्री. विजय हिंगमीरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सर्कल व विभागीय पदाधिकारी समवेत पगारवाढ निधी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला कामगार महासंघाचे प्रदेश अध्यक्ष श्री. जयप्रकाश होळीकर साहेब, श्री. सुभाष सावजी साहेब, श्री. आंबेगावकार साहेब व श्री. इनामदार साहेब उपस्थित होते.

बैठकीमध्ये उपमहामंत्री श्री. विजय हिंगमीरे साहेब यांनी १०० टक्के पगारवाढनिधी जमा करून लवकरात लवकर केंद्राकडे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. तेंव्हा सर्व पदाधिकाऱ्यांनी लवकरात



लवकर पगारवाढ निधी जमा करून केंद्राकडे पाठवण्याचे आश्वासन दिले.

## आढावा बैठक- पुणे





पुणे परिमंडळामध्ये पगारवाढ निधीबाबत आढावा बैठक दि.२० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठिक ६ ते ९ यावेळेत सौदामिनी सभागृह येथे संपन्न झाली. मबैठकीत पुणे झोन अंतर्गत प्रदेश,कंपनी,झोन,सर्व सर्कल व सर्व विभागीय पदाधिकारी उपस्थित होते.

## लातुर कार्यालय भेट





श्री. आर. एल. कुलकर्णी वितरण सचिव कामगार महासंघ यांनी लातूर संघटना कार्यालयास प्रथम भेट दिली असता सघंटनेतर्फे सत्कार करत असता ना श्री. एस. पी. माने, झोनल अध्यक्ष तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे नाशिक झोन कोषाध्यक्ष श्री. एम. एन. पाठक यांचाही श्री. गडगडे, प्रदेश सचिव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वरील कार्यक्रमास महासंघाचे अध्यक्ष श्री. होळीकर यांची उपस्थिती लाभली होती.

# कार्यसमिती बैठक- कल्याण झोन







**दिनांक १६/०२/२०२०** रविवार रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ कल्याण झोनची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठक कल्याण (झोनचे उपाध्यक्ष) श्री. निलेश भगत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मार्गदर्शक मा श्री. अरुण पिवळ साहेब (कार्याध्यक्ष वितरण) उपस्थित होते. त्यांनी पगारवाढ निधी आढावा घेऊन पगारवाढ निधी व संघटन वाढ करण्याकरिता मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच बैठकीस श्री. प्रशांत भाबुर्डेकर, निवासी सचिव प्रदेश प्रभारी कल्याण परिमंडल, श्री. बाळासाहेब आवारे, निवासी सचिव वितरण व श्री. चंद्रकांत नेवे, सघंटन मंत्री निवृत जेष्ठ नागरिक संघ यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.

बैठकीचे विषय १) बैठकीत पगारवाढ निधी २) संघटन वाढ ३)नविन वर्षात सभासद नोंदणी ४) संपर्क अभियान ५)२०२० वर्षात कार्यक्रम नियोजन ६) पदाधिकारी यांना संघटने काम करत असताना येणारी अडचणी वर मार्गदर्शन. बैठकीचे सूत्रसंचलन कल्याण परिमंडल (झोन सचिव ) सचिन कदम यांनी केले आभार श्री वैभव मस्के सचिव वसई मंडळ यांनी केले या वेळी सर्व झोन पदाधिकारी , सर्कल पदाधिकारी , विभागाचे पदाधिकारी सभासद उपस्थित होते




नारायण गडगडे प्रदेश सचिव वितरण हे कंपनीचे सेवेतून निवृत झाले कारणाने सघंटनेस ११००० रुपये देणगी दिली सोबत महासंघाचे पदाधिकारी

# सेवा निवृत्ती : श्री. एन. डी. गडगडे - लातूर

**विलास झोडगेकर**

महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लातुर झोनमध्ये सहाय्यक लेखापाल या पदावर कार्यरत असलेले महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे वितरण कंपनीचे सचिव श्री. एन. डी. गडगडे हे दि. २८ फेब्रुवारी २०२० रोजी कंपनीच्या सेवेतून निवृत्त झाले. निवृत्तीनंतरच्या निरामय दिर्घायुष्यासाठी आपल्या सर्वांच्या वतीने त्यांना भरपूर शुभेच्छा!

साधारणतः गेल्या २३-२४ वर्षांपासून मी श्री. गडगडे यांना एक कार्यकर्ता या नात्याने ओळखतो. श्री. होळीकर व धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामगारांनी इंटकचा त्याग करून कामगार महासंघात प्रवेश केला. त्यात श्री. गडगडे सुद्धा होते. होळीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवूनच त्यांनी कामगार संघात प्रवेश केला होता. परंतु पुढे जाऊन त्यांनी भारतीय मजदूर संघाच्या रिती-निती पद्धतीनुसार स्वतःला विकसीत केले व कायम श्री. होळीकर यांचे निष्ठावंत सहकारी ही भूमिका पार पाडली.



वीज कामगार महासंघाचे अधिवेशन लातुरला झाले. त्यावेळी माझा तिथल्या सर्वच कार्यकर्त्यांशी खूप जवळून परिचय झाला आणि असे लक्षात आले की या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांना फक्त थोडे प्रोत्साहन देण्याची व त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. श्री. गडगडे हे सुद्धा अशीच प्रचंड क्षमता असणारे कार्यकर्ते असल्याचे त्यावेळी लक्षात आले. संघटना म्हणून तर श्री. गडगडे यांची ताकद आहेच परंतु व्यक्तीगतरित्या सुद्धा श्री. गडगडे यांची स्वतःची अशी ताकद आहे.

श्री. गडगडे यांची क्षमता लक्षात घेऊन त्यांची लातुर झोनच्या सचिवपदी निवड करण्यात आली. श्री. होळीकरजी व आंबेगावकरजी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अतिशय समर्थपणे झोनल सचिवपदाची धुरा सांभाळली. या काळात त्यांची लातुरबाहेर बदली झाली. परंतु कोणताही प्रतिष्ठेचा प्रश्न न करता त्यांनी बदली स्वीकारली. अर्थात लातुरला त्यांची आवश्यकता लक्षात घेऊन श्री. होळीकर यांनी स्वतः लक्ष घालून त्यांना लवकर स्वगृही आणले.

पनवेल अधिवेशनात त्यांची वितरण कंपनीच्या सचिवपदी निवड झाली. त्यांनी कंपनी सचिव पदाला तर योग्य तो न्याय दिलाच शिवाय लातुर झोन सचिव जय धुमाळे हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे काही काळ रजेवर होते. या काळात श्री. गडगडे यांनी त्यांची उणीव भासु दिली नाही.

श्री. गडगडे हे संपन्न व सुशिक्षित परिवाराचे घटक आहेत बऱ्याच जबाबदाऱ्या सेवेत असतांनाच त्यांनी पूर्ण केल्या आहेत. प्रकृती उत्तम आहे आणि सामाजिक कामाची आवड सुद्धा आहे. त्यामुळे सेवानिवृत्ती ही फक्त महावितरण पुरती मर्यादित आहे. कामगार महासंघाच्या कामातून त्यांना निवृत्त होता येणार नाही. अर्थात ते श्री. होळीकरजींचे अनेक वर्षांपासूनचे निकटचे सहकारी असल्याने श्री. होळीकरजी त्यांना निवृत्त होऊ देणार नाहीत. त्यांच्या अनुभवाचा व दांडग्या संपर्काचा उपयोग संघटना करून घेईल व ते सुद्धा नाही म्हणणार नाहीत याची मला खात्री आहे.

**पुन्हा एकदा श्री. गडगडे यांना भरपूर शुभेच्छा.**

# सेवापूर्ती- श्री. सी. बी. केदार- जळगाव

**विलास झोडगेकर**

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे माजी प्रसिद्धी प्रमुख श्री. सी. बी. केदार हे उपव्यवस्थापक (मा. सं.) या पदावरून दि. २८ फेब्रुवारी २०२० रोजी जळगाव येथून निवृत्त झाले. निवृत्तीनंतरच्या आरोग्यदायी दिर्घायुष्यासाठी श्री. केदार यांना भरपूर शुभेच्छा. सध्या श्री. केदार हे विश्वकर्मा सहकारी पतसंस्था धरणगाव या कामगार महासंघ संचलित पतसंस्थेचे चेअरमन आहेत.



स्वर्गीय नानासाहेब बिचवे, श्री. सुभाष भावसार, सुरेश सोनार, स्व. एल. जी. पाटील यांच्या तालमीत श्री. केदार यांची जडणघडण झाली. स्वर्गीय नानांचे मार्गदर्शन व श्री. सुभाष भावसार, सुरेश सोनार यांच्या सहकार्यामुळे श्री. केदार यांच्या नेतृत्वाचा विकास झाला. मानव संसाधन विभागात ते कार्यरत असल्याने सेवा नियमांची त्यांना चांगली जाण होती. काही मागासवर्गीय कामगारांच्या भरतीचा जळगाव सर्कलमध्ये मोठा घोळ झाला होता. सिलेक्शन होऊन सुद्धा अपॉइंटमेंट मिळत नव्हती. कोर्टबाजी झाली तरी न्याय मिळत नव्हता. श्री. केदार यांनी या प्रकरणाचा अतिशय तपशीलात जाऊन अभ्यास केला होता. त्यांच्याकडे संघटनेचे फार मोठे पद नव्हते तरीसुद्धा त्यांनी अतिशय चिकाटीने हे प्रकरण हाताळले. अनेकदा मुख्य कार्यालयाचा दरवाजा ठोठावला. अनेक वर्षे पाठपुरावा करून त्यांनी सर्वांना न्याय मिळवून दिला. यावरून त्यांची चिकाटी लक्षात येते.

स्थापनेपासून विविध उपक्रम राबवणाऱ्या व कामगार महासंघाच्या रिती नितीनुसार चालणाऱ्या धरणगाव पतसंस्थेचे चेअरमन म्हणून सुद्धा त्यांची कामगिरी गौरवास्पद आहे. श्री. सुभाष भावसार यांनी अनेक वर्षे या पतसंस्थेचे नेतृत्व केले. त्यांनीच अनेक उपक्रम सुरू केले. श्री. केदार यांनी यात भर घातली. दरवर्षी सुवर्णमुद्रा भेट देणारी ही एकमेव पतसंस्था आहे.

दरम्यानच्या काळात महासंघाचे विद्यमान महामंत्री श्री. शंकरराव पहाडे काही काळासाठी जळगाव झोनला बदलून आले होते. त्या काळात केदार हे त्यांच्या संपर्कात आले. या संपर्कामुळे त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा अधिक विकास झाला. सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या कुटुंबियांनी आयोजित केलेल्या कार्यगौरव समारंभास महामंत्री शंकरराव पहाडे आवर्जुन उपस्थित होते. यावरून श्री. केदार यांचे कार्य लक्षात येते. सामाजिक कार्य हे श्री. केदार यांचे अंगभुत वैशिष्ट्ये असल्याने निवृत्तीनंतर सुद्धा त्यांचे कार्य थांबणार नाही. त्यांच्या ज्ञानाचा व चिकाटीचा कामगार महासंघ सुद्धा निश्चितच उपयोग करून घेईल.

**पुन्हा एकदा त्यांना अनेक अनेक शुभेच्छा.**

# भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा कार्यालयाला शैक्षणिक भेट





**दि. १८/०२/२०२०** रोजी कर्वे समाज सेवा संस्था पुणे येथील एमएसडब्ल्यू विद्यार्थीनी ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट विषयाकरिता संस्थेचे प्रा. शर्मिला सचदेव यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रांतांतील – परदेशातील (यूएसए) २२ विद्यार्थी –विद्यार्थीनी यांनी भेट दिली.

भारतीय मजदूर संघांची ओळख, कामकाजाची माहिती, रिती निती पध्दत, याची माहिती भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी सचिन मेंगाळे व उमेश विस्वाद यांनी दिली .संघटीत क्षेत्रातील निगोशियशन व असंघटीत कामगारांची स्थिती, कामगारांचे आरोग्य, कल्याणकारी योजनांची माहिती दिली. या मध्ये कामगार क्षेत्रातील आव्हाने, समस्या व संघटना करित असलेल्या उपाय योजनाची माहिती दिली.

# औरंगाबाद मध्ये कंत्राटी कामगारांचा मेळावा






**औरंगाबाद मधील** महावितरण व् महापारेषण कंपनी वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्याकरिता संघर्ष करण्याचे आवाहन महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष श्री. निलेश खरात यांनी दि २३/२/२०२० रोजी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ पतसंस्था कार्यालय मालखरे आर्किड येथे झालेल्या कामगार मेळाव्याला संबोधीत करताना प्रतिपादन केले.

औरंगाबाद जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांचे किमान वेतनातील वाढ २० टक्के पुरक भत्ता, पगार वाढ, यांची काटेकोर अंमलबजावणी इ.एस.आय., पी एफ. चा लाभ, रोजगारातील स्थैर्य, शाश्वती, संघटनेची वाटचाल इ. विषयाबाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या सर्व समस्यांना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघटने शिवाय पर्याय नाही. असे प्रतिपादन महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे कार्याध्यक्ष महावितरण श्री. अरूण पिवळ यांनी मेळाव्यात बोलताना केले.

या मेळयाव्याचे प्रास्ताविक संघटनेचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले. या मेळाव्याला श्री. वाल्मिक निकम, झोनल सचिव कामगार महासंघ, कंत्राटी कामगार संघाचे पदाधिकारी श्री. तात्या सावंत, सुभाष कांबळे, (जालना) निखिल टेकवडे, (पुणे), अन्सार खान, सुभाष निकम, (औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले.

या मेळाव्यात औरंगाबाद झोन मधील महावितरण व महापारेषण या कंपनीतील कंत्राटी कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी औरंगाबादमधील कामगार महासंघाचे पदाधिकारी कंत्राटी कामगार संघाचे श्री. अन्सार खान, सुभाष निकम आदी कंत्राटी कामगारांनी प्रयत्न केले.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचा ११ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी जनशताब्दी वर्ष व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाला ११ वर्षे पूर्ण म्हणून वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांचे मेळावे नुकतेच पुणे व कल्याण येथे संपन्न झाले. दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी विश्वकर्मा भवन पुणे येथे झालेल्या मेळाव्याला भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस रविंद्र देशपांडे व भारतीय मजदूर संघाचे उपाध्यक्ष सुभाष सावजी यांची विशेष उपस्थिती होती.

श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी जन्म शताब्दी वर्षानिमित्त विविध जिल्हयात कामगार मेळावे, संपर्क मोहिमेद्वारे भारतीय मजदूर संघ सर्व सामान्य सभासदांपर्यंत पोहोचविण्याकरिता प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन मा. रविंद्र देशपांडे यांनी केले. तसेच मा. सुभाष सावजी यांनी वीज उद्योगातील संघटना होण्यापुर्वी कंत्राटी कामगारांची स्थिती व गेल्या ११ वर्षामध्ये संघटनेच्या माध्यमातून, प्रयत्नातुन आजची स्थितीमध्ये मोठया प्रमाणात सकारात्मक बदल, वाटचालीबाबत मनोगत व्यक्त केले. या वेळी कंत्राटी कामगार संघाचे पुर्व अध्यक्ष शरद संत, कामगार महासंघाचे उपमहामंत्री विजय हिंगमिरे, सरचिटणीस सचिन मेंगाळे, वित्तमंत्री धनंजय इनामदार, कार्याध्यक्ष उमेश आणेराव, संघटन मंत्री राहूल बोडके, कोषाध्यक्ष सागर पवार, संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष संगीता शेलार, पुणे झोन सचिव सुमित कांबळे, संस्थापकीय सदस्य आप्पा जाधव, पुणे महानगरातील कंत्राटी कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. गेल्या ११ वर्षातील संघटनेतील वाटचाल, आदोलने, किमान वेतनातील सुधारणा २० टक्के विशेष वेतनवाढ इ. बाबतीत मार्गदर्शन केले.






# वीज निवृत्त जेष्ठ नागरीक संघाची मासिक बैठक संपन्न योग शिक्षकांनी दिली योगा बाबत माहिती

**नंदुरबार दि. ०१/०३/२०२०**

_ नंदुरबार जिल्हा निवृत्त वीज कामगार जेष्ठ नागरीक संघाची मासिक बैठक कामनाथ महादेव मंदिर नंदुरबार येथे संपन्न झाली. मा. जगन्नाथ लोखंडे यांचे अध्यक्षतेखाली व मा. भिमगिर गोसावी, योग शिक्षक श्री. अजयसिंह गिरासे, मा. एस. के. मन्सुरी, मा. डि. व्ही. ठाकरे यांची उपस्थिती लाभली होती. सभेचे सुत्रसंचलन श्री. अनिल बरे यांनी केले होते. या बैठकीत नंदुरबार, शहादा, तळोदा, नवापुर या सर्व तालुक्यांतुन सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला रनाळा येथील सेवा निवृत्त कर्मचारी श्री. डी. डी. चौधरी यांच्या मोतोश्रीच्या निधनामुळे श्रध्दांजली वाहण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प देवुन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सेवा निवृत्त कर्मचारी वर्गाला मा. भिमगीर गोसावी सर यांनी यथायोग्य व उतारवयात कशी काळजी घ्यावयाची या बाबत योग्य ते मार्गदर्शन केले. श्री. मिसाळ यांनी आता आपल्यासाठी थोडा वेळा काढा राहिलेले आयुष्य आनंदी जगा असा सल्ला देत तुळजाभवानी धार्मिक यात्रा बद्दल माहिती दिली.

_ या सभेचे खास आकर्षण म्हणजे योग शिक्षक मा. अजयसिंह गिरासे यांनी स्वतः अनेक योग प्रकार सर्वासमोर करुन दाखविली व त्याप्रमाणे जेष्ठांना उचीत अशी माहिती दिली. तसेच प्रत्येकाने सकाळी उठल्यानंतर जमिनीवर पाय ठेवण्याच्या आधी कशी काळजी घेतली पाहिजे या बद्दल विस्तृत माहिती दिली. तसेच थंडगार पाणी न पिण्याचा सल्ला दिला.



योगाच्या माध्यमातुन आपण कशी काळजी व योगाचा कोणता योग्य प्रकार किती वेळ करावा याबाबत सर्वांना माहिती दिली. अनेक सभासदांनी त्यांच्या मनांत असणाऱ्या शंका उपस्थित केल्या श्री. गिरासे यांनी समर्पक असे सर्वांचे समाधान केले. हा योगाचा कार्यक्रम नेहमीचा मासिक सभेपेक्षा हटके होता._ अध्यक्ष मा. जगन्नाथ लोखंडे यांनी खास अहिराणी भाषा वापरुन आपले अध्यक्षीय भाषण केल्याने सर्वांची मने जिंकली. समारोप श्री. मंगलेशभाई शाह यांनी केला सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी श्री. आर. के. गिरासे, सदाशिव मराठे, देविदास वाघ, अनिल बरे, विनायक वाणी यांनी परिश्रम घेतले. श्री. भोंगे केटर्स (ब्राम्हणवाडी) यांनी भोजन व्यवस्था सांभाळली, कामनाथ महादेव मंदिर संस्था यांनी बहुमोलाचे सहकार्य केले. या बैठकीत ५० ते ६० सभासद प्रतिनिधीनी उपस्थिती दिली. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमात रंगत आली.


## दि रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर (सेंट्रल) नियम १९५६ च्या अन्वये वृत्तपत्राच्या मालकीसंबंधी करावयाचे निवेदन

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | ४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक- ४२२ ००२ |
| २) | प्रकाशन काळ | : | प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेस प्रसिद्ध होते. |
| ३) | मुद्रकाचे नाव व पत्ता | : | श्री. कमलाकर कृष्णाजी मोहरीर ४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड नाशिक- ४२२ ००२ |
| ४) | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ५) | प्रकाशकाचे नाव व पत्ता | : | श्री. कमलाकर कृष्णाजी मोहरीर ४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक- ४२२ ००२ |
| ६) | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ७) | मालकाचे नाव व पत्ता | : | जनरल सेक्रटरी, भारतीय मजदूर संघ (महाराष्ट्र प्रदेश) विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० |
| ८) | मुद्रणस्थळ | : | विकास पिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि., ३२, एम. आय. डी. सी., सातपूर, नाशिक- ४२२ ००७ |

मी, श्री. कमलाकर कृष्णाजी मोहरीर असे जाहीर करतो, की वर नमूद केलेली सर्व माहिती खरी व बरोबर आहे.

दि. २५ मार्च २०२०

कमलाकर कृष्णाजी मोहरीर

Postal Regd. No. NSK/RNP-244/2018-2020


प्रति,

STAMP

If not delivered, please return to :

मजदूर संकेत

४, 'मार्शल आर्केड', राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक श्री. कमलाकर कृष्णाजी मोहरीर यांनी जनरल सेक्रेटरी, भारतीय मजदूर संघ (महाराष्ट्र प्रदेश) यांचे करिता विकास प्रिंटींग ॲन्ड कॅरिअर्स प्रा. लि., प्लॉट क्र. ३२, सातपूर औद्योगिक वसाहत, त्र्यंबक रोड, नाशिक- ४२२ ००७ येथे मुद्रित करून ४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक - ४२२ ००२ येथून प्रसिद्ध केले. फोन / फॅक्स : ०२५३ - २५७९१६७ • संपादक : कमलाकर कृष्णाजी मोहरीर •